## प्रकरण आठवे

# उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत शोधप्रबंधात प्रामुख्याने सात प्रकरणांची योजना केलेली असून पहिल्या प्रकरणातून संशोधकाने विषय निवडीमागील भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या संशोधनातून कोणकोणती उद्दिष्टे साध्य केली जाणार आहेत?, त्याची समाजोपयोगीता काय? त्याचबरोबर संशोधनाची मर्यादा व व्याप्ती स्पष्ट केलेली असून पूर्व संशोधनाचा आढावाही घेण्यात आला आहे. या संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धती व तंत्रे स्पष्ट केली आहेत. डांग जिल्ह्याचा संबंध परिचयही याच प्रकरणात करून देण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणाच्या माध्यमातून संशोधकाने लोकसाहित्याच्या विविध संज्ञा, संकल्पना समजून घेतल्या आहेत. विविध अभ्यासकांची मते जाणून घेऊन पुढच्या अभ्यासाची भक्कम बाजू तयार केली आहे. यातूनविविध अभ्यासक-संशोधकांनी मांडलेले सिद्धांत, निर्माण केलेल्या संज्ञा व संकल्पना, विविध अभ्यास पद्धती, एकमेकांवर केलेले आरोप प्रत्यारोप, त्यातून निघालेले निष्कर्ष या सगळ्यांचा धांडोळा घेत घेत संशोधक पुढे गेला आहे.

खऱ्या अर्थाने संशोधन कार्य तिसऱ्या प्रकरणापासून सुरु झालेले असून यामध्ये अनेक लोककथांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये देवकणसराची लोककथा, देवटाफरा आणि निळपसौर यांची लोककथा, धनसऱ्या आणि कनसऱ्याची लोककथा, होली आणि होलाची लोककथा, जळींतकाराची लोककथा, सतरपती पाटलाची लोककथा या प्रमुख लोककथांचा येथे विचार केला गेला आहे. या लोककथांतून डांगी आदिवासींच्या भावभावनांचे प्रकटन सहज झालेले दिसून येते. वेगवेगळया कल्पना, निर्माण केलेली वेगवेगळी प्रतीके यांचा मोठा भरणा या लोककथांतून दिसून येतो. पृथ्वीबरोबर मानवाची, इतर प्राण्यांची, कीटकांची कशी निर्मिती झाली? त्याला कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या? या सगळ्यांचा धांडोळा या लोककथा घेतांना दिसतात.

चौथ्या प्रकरणातून लोकगीतांचा अभ्यास करण्यात आला आहे. ही लोकगीते डांग जिल्ह्यातील आणि डांगी बोली बोलणाऱ्या व्यक्तींकडून जरी गायली जात असली तरी ती अस्सल मराठी वळणाची आहेत असे ही लोकगीते ऐकल्यानंतर लक्षात येते. अर्थात ही लोकगीते समजून घेण्यासाठी, त्यांचा योग्यतो अर्थ लावण्यासाठी डांग जिल्ह्यातील लोकसंस्कृती आधी समजून घेतली पाहिजे. तरच ह्या लोकगीतांचा नीट अर्थ लागू शकतो. परिसरातील अनेक घटना प्रसंग या लोककथा आणि लोकगीतांतून गुंफलेले असतात. येथील आदिवासी स्त्रियांच्या भावभावनांच्या नाजूक छटा यातून उमलतांना दिसतात. स्त्रियांच्या लोकगीतांतून सांसारिक घटना प्रसंग, कोमल भाव, दुःख, आपुलकी, सहानुभूती, जगण्याची जिद्द, जबाबदारी दिसून येते. तर पुरुषांच्या लोकगीतांतून परिसरातील स्थळ महात्म्य, गायी-गुरांना दिलेले देवत्व दिसून येते.

पाचवे प्रकरण डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांच्यावर आधारित असून त्यातून कधी विनोद तर कधी जीवनातील सत्य मार्मिक आणि मोजक्या शब्दात दिग्दर्शित केलेले दिसते. यातून कधी कधी अतिशयोक्तीही झालेली दिसून येते. ही अतिशयोक्ती बहुतेकदा हास्यविनोद निर्माण करण्यासाठी योजलेली युक्ती असते. म्हणी किंवा वाक्प्रचार आकाराने लहान असले तरी त्यात जीवनातील मोठे सत्य उलगडण्याची ताकद असते. ही ताकद माणसाला जीवन जगण्यासाठी प्रेरणा देते. गतजीवनात घडलेल्या अनेक घटनांचा त्यात साठलेला अनुभवांश असतो. हा अनुभवांश येणाऱ्या पिढीला प्रेरणा देत त्यांचे जीवन समृद्ध करत असतो. प्रस्तुत प्रकरणातील विविध म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांचे आकलन केले असता आपल्याला त्याची सत्यता पटते.

सहावे प्रकरणहे लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्यावर आधारित असून त्यातून डांग जिल्ह्यात प्रचलित असलेल्या त्या त्या घटकानुसार अनेक लोकसमजुती नमूद केलेल्या आहेत. डांगी आदिवासी अनेक लोकसमजुतींना आपलेसे करून त्यातून आपले जीवन समृद्ध करू पाहात आहे. या लोकसमजुतींच्या आधारे आपल्या जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातून आपल्याला सुख, समाधान लाभेल अशी आशा त्यांच्याठिकाणी दिसून येते. या सगळया लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्या मागे भीती आणि आशा दडलेल्या आहेत. भीती याच्यासाठी की, आपल्या जीविताला काही बाधा पोहोचू नये. आणि आशा याच्यासाठी की, आपले जीवित कार्य सफल,समृद्ध आणि समाधानकारक रीतीने व्यतीत व्हावे. थोडक्यात आपल्याला सुख प्राप्त व्हावी ही आशा या लोकसमजुतींच्यामागे असलेली दिसून येते.

सातवे प्रकरण हे डांगी बोलीवर अवलंबून असून त्यातून डांग जिल्ह्यात बोलली जाणारी डांगी बोली कशी आहे? तिचे स्वरूप काय? तिच्यावर कोणकोणत्या बोली-भाषांचा प्रभाव आहे? तिच्या अंतर्गत बोलींचे स्वरूप काय? आणि कसे आहे? त्या संदर्भात विविध अभ्यासकांचे मत काय? या सगळयांचा धांडोळ ग्रिअर्सनपासून आतापर्यंत वेगवेगळया घटकांना अनुसरून घेण्यात आला आहे. यातून समग्र डांगी बोलीचे आकलन होईल अशी आशा आहे.

या प्रत्येक प्रकरणाचा यथासांग अभ्यास केल्यानंतर त्यातून काही निष्कर्ष अभ्यासकाच्या हाती आले आहेत.प्रत्येक प्रकरणानुसार वेगवेगळे निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष:**

**८. १. प्रकरण पहिले: अ) विषय प्रवेश ब) डांग: भौगोलिक परिसर**

- ‘डांग’ शब्दाच्या अर्थाचा विचार करता अनेक कोशकारांचे मत वरवर पाहता वेगवेगळे वाटत असले तरी सगळयांचा मतितार्थ मात्र एकच असून ‘डांग’ म्हणजेच जंगलयुक्त प्रदेश, डोंगर टेकड्यांचा प्रदेश होय.
- डांग जिल्ह्यात बागायती शेती आढळत नाही. कारण, संबंध डांग जिल्हा डोंगराळ प्रदेश असून जंगलाने परिपूर्ण भरलेला आहे. शिवाय नदीचे पाणी मोठ्या धरणाच्या रुपात कुठेही अडवलेले नाही. परिणामी पावसाचे सगळे पाणी वाहून जाते. त्यामुळे सिंचन व्यवस्था कुठेही दिसत नाही. येथील आदिवासी पारंपरिक पद्धतीने शेती करतात.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींसाठी नद्या उदरनिर्वाहाचे साधन बनून राहिल्या आहेत. असे असले तरी नदीची पातळी दिवसेंदिवस घटत चालली असून ही त्यांच्यासाठी चिंतेची गोष्ट आहे.
- आजही रामायण, महाभारत काळातील इतिहासाच्या पाऊलखुणा शबरीधाम, पंपा सरोवर, अंजन कुंड, पांडव गुफा इत्यादी पौराणिक स्थळांच्या सहाय्याने दाखवून देता येतात.
- डांगमधील जाती-जमातीनुसार त्यांच्या बोलीत, राहणीत, व्यवहारात, वेशभूषेत, केशभूषेत, घरांच्या रचनेत, व्यवसायांत, रीतीरीवाजांत, एकूणच सगळ्या सांस्कृतिक जीवन व्यवहारात थोडेफार फरक असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रत्येक जमातीची स्वतःची काही खास वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.
- डांग जिल्ह्यातील अनेक जमातींपैकी ‘भिल्ल’ ही जमात वैशिष्ट्यपूर्ण असून या जमातीचे डांग जिल्ह्यावर असलेले प्राबल्य पौराणिक काळापासून दिसून येते.
- डांग जिल्हा भिल्ल, कोकणा (कुंकणा/कुणबी/कोकणी), वारली, गामित/गावित या प्रमुख जमातींबरोबरच चोधरा/चोधरी, दुबळा, मावची, विटोलिया/कोटवाळा, धोडिया, नायक, नायका अशा अनेक जमातींनी बनलेला जिल्हा आहे. डांग जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासींचे प्रमाण ९३ टक्के इतके आहे. यावरून डांग जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा आहे असे सिद्ध होते.
- डांगी आदिवासी हे निसर्गोपासक असल्याचे त्यांच्या राहणीमानावरून, जीवनसरणीवरून, विचारसरणीवरून, विधीविधानांवरून, आहार-विहारावरून लक्षात येते.
- डांगी आदिवासींमध्ये अनौपचारिक शिक्षण पद्धतीची प्राचीन परंपरा पाहायला मिळते. हे आपल्याला शिकारीचे कौशल्य, शेतीचे कौशल्य, बांबू किंवा लाकडापासून बनवल्या जाणाऱ्या विविध वस्तू, घरांची बांधणी किंवा दुरुस्ती, लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, वनौषधींचे ज्ञान इत्यादींच्या सहाय्याने दाखवून देता येते.

- डांग जिल्ह्यातील आदिवासींसाठी जंगलाचे महत्त्व अनन्यसाधारण असून जंगलावरच त्यांचे भरणपोषण अवलंबून आहे.

### ८. २. प्रकरण दुसरे: लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप:

- लोकसाहित्याचे बीज भाषाभ्यासातून अंकुरले असे म्हणावे लागते.
- लोकसाहित्य बहुआयामी असून अनेक शास्त्रांना उपयोगी ठरत असल्याचे दिसून येते. उदा. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादी.
- लोकसाहित्याची एकच एक व्याख्या दिसून येत नाही.
- लोकसाहित्याची सर्वसमावेशक, परिपूर्ण अशी व्याख्या अजून तरी कोणाला करता आल्याचे दिसत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे लोकसाहित्याची अतिव्याप्ती होय.
- बहुतेकदा लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यात अभ्यासकांची, संशोधकांची घालमेल झालेली दिसून येते. यामुळेच काही अभ्यासक, संशोधक लोकसाहित्याला लोकसंस्कृती म्हणतात तर काही अभ्यासक, संशोधक लोकसंस्कृतीला लोकसाहित्य म्हणतात.
- लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन असले तरी काहीवेळा लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्या सीमा एकमेकांत विलीन झालेल्या दिसून येतात.
- भारतात लोकसाहित्याची परंपरा प्राचीन असली तरी शास्त्रोक्त पद्धतीने लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन पाश्चात्यांनीच केले.
- लोकसाहित्याच्या लिखित खुणा वेदवाङ्मयात सापडतात. हा लिखित वाङ्मयाचा सर्वात प्राचीन पुरावा आहे.

### ८. ३. प्रकरण तिसरे: डांग जिल्ह्यातील लोककथा:

- लोककथांनी समाजाच्या प्रबोधनाचे आणि करमणुकीचे महत्त्वाचे कार्य आजतागायत केले आहे. याला अपवाद डांग जिल्ह्यातील लोककथाही नाहीत असे दिसून आले आहे.
- लोककथांचे निर्मितीनंतर भ्रमण सुरु होते, ह्या लोककथांचे ज्या ज्या प्रदेशात भ्रमण होते त्या त्या प्रदेशातील संस्कृतीप्रमाणे त्यांच्यात परिवर्तन होत असते. त्यामुळेच एकच कथा वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या रुपात ऐकायला मिळते.
- लोककथा ही अनौपचारिक शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम असून तिच्याद्वारे समाज संघटीत राहण्यास मदत होते.

- लोककथांच्या माध्यमातून लोकांच्या इच्छा-आकांक्षा, समाजाची जीवनमूल्य प्रकट केली जातात.
- डांगच्या लोककथांतून समाज जीवनाचे दर्शन घडते. तसेच साहचर्य, नीती, धैर्य, व्यवहारचातुर्य, बंधुभाव, आपुलकी इत्यादी मूल्यांचे दर्शन घडते.
- कल्पनाबंध हा डांगच्या लोककथेचा महत्त्वाचा घटक असून एकाच लोककथेत अनेक कल्पनाबंध आढळून येतात.
- पशु-पक्ष्यांचे माणसात रुपांतर, कुणब्याला भविष्य सांगणारा पोपट, देवकणसराचे मुलीतून शेतीत आणि शेतीतून मुलीत होणारे रुपांतर असे अनेक कल्पनाबंध डांग जिल्ह्यातील लोककथेत आढळतात.
- पुण्य मिळविण्यासाठी, अशुभ निवारणासाठी, मनोकामना पूर्ण करण्यासाठी, बाळ-बाळंतीनीला सुख संपदा लाभण्यासाठी, मृतात्म्याला शांती लाभण्यासाठी, मनोरंजनासाठी तसेच प्रबोधनासाठी डांग जिल्ह्यात लोककथा सांगितल्या आणि ऐकल्या जातात.
- डांगच्या लोककथेतून भाबडेपणा, श्रद्धा, निष्ठा, चतुराई, द्वेष, मत्सर, प्रेम या भावभावनांचे क्षणोक्षणी दर्शन होते.
- 'सतरपती पाटील' या लोककथेच्या माध्यमातून असे सांगता येते की, मृत्यू ही अटळ घटना असून त्याला कोणीही टाळू शकत नाही.
- शेतीविषयक अनोखी कल्पना प्रस्तुत लोककथांतून पाहायला मिळते. मका हे त्यातील प्रमुख पिक असल्याचे दाखवले आहे.
- विविध विधीप्रसंगी दारूला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असले तरी दारू ही कोणत्याही माणसाला खरे बोलायला भाग पाडते. हे प्रस्तुत प्रकरणातील लोककथांच्या माध्यमातून दाखवून देता येते.
- प्रस्तुत प्रकरणातील लोककथांचा विचार करता या लोककथांमध्ये हास्य, विनोद, अद्भुत, रहस्य, बोध, पराक्रम, अनुभव, उत्पत्ती यांचे प्रकर्षाने दर्शन होते. यावरून असे म्हणता येते की, प्रस्तुत प्रकरणातील लोककथा अनेक लोककथाप्रकारांना स्पर्शून जातात.
- डांगी आदिवासींना सोन्या-चांदीचे भारी आकर्षण असल्याचे त्याच्या लोककथांवरून दिसून येते. उदा. सोनान्या खुर्च्या, चांदीन्या खुर्च्या, चांदीना रोड, सोनाना रोड, सोनिया घडा, सोनिया चुंबळ, सोन्या दरवाजा (योनीद्वार), सोनपूर, सोनाय देवळी, सोनावती या प्रत्येक नावातून सोन्या-चांदीचे नाव उल्लेखित होते.
- डांगच्या लोककथांतून परस्त्री संबंध उत्कटतेने प्रदर्शित केला जातो. उदाहरणार्थ महादेव आणि सोनावतीचे मिलन, निळूपांडव आणि मुरुदेवकन्येचे मिलन, हेमलीन गावतीन आणि काकऱ्या पारधीचे मिलन.

- प्रसुतीचे वर्णन, मासिक पाळीचे वर्णन, परस्त्रीसंगाचे वर्णन लोककथेतून वेळोवेळी येत असले तरी त्यातून अश्लीलतेचा भाव प्रकट होत नाही. हे येथील लोककथांचे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.
- मासिक पाळीचा प्रसंग असेल, प्रसुतीचा प्रसंग असेल किंवा पाचवीचा प्रसंग असेल या सर्वांचे बारकावे प्रस्तुत लोककथांतून टिपलेले दिसून येतात.
- एकाच मूळ लोककथेत अनेक स्वतंत्र उपकथा गुंफलेल्या असतात असे दिसून आले आहे. उदाहरणार्थ सावाय राणीच्या केसांपासून तेरुली मुंगीचा जन्म, सुईणीने फेकलेल्या घुगऱ्यांपासून कोतीची निर्मिती इत्यादी. यातून कथकाची स्वतंत्र शैली प्रदर्शित होते.
- प्रस्तुत लोककथा कधी देवांना असामान्य देवत्व प्रदान करतात तर कधी जनमानसाच्या पातळीवर आणून सोडतात.
- नावे धारण करण्याची एक अनोखी रीत येथील लोककथांतून दिसून येते. उदाहरणार्थ वनस्पतीचे नाव म्हणून वनसापती, पळसाचे वन म्हणून पळसवन, रसोडा (स्वयंपाक) बनवणारा म्हणून रसोड्यादेव इत्यादी.
- लोककथेत परिवर्तन घडवून आणण्यास कथकाची कथनशैली किंवा निवेदनशैली महत्त्वाचे कार्य करते.
- डांगच्या लोककथांतून निसर्गातील अनेक घटकांचे वर्णन केलेले असते. या घटकांच्या माध्यमातून आदरयुक्त, भीतीयुक्त, आश्चर्यकारक, कल्पनातीत स्वाभाविक चित्रण केलेले दिसून येते.
- येथील लोककथांमधून स्थानिक परिसराची माहिती प्रभावीपणे चित्रित केलेली दिसून येते. लोकांच्या प्रचलित समजुती, चालीरीती, गुणदोष, ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिसर यांचा चांगला परिचय करून दिलेला दिसून येतो.
- पृथ्वीच्या निर्मितीची कथा आणि मानव निर्मितीची कथा म्हणून 'जळींतकार' या लोककथेकडे पाहता येते.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींच्या दैनंदिन जीवन व्यवहारातील अनेक घटना प्रसंग येथील लोककथांतून गुंफलेले दिसून येतात.

**८. ४. प्रकरण चौथे: डांग जिल्ह्यातील लोकगीते:**

- डांग जिल्ह्यातील लोकगीतांना मौखिक परंपरा असून त्यांना सामाजिक संदर्भ लाभलेला आहे.
- डांग जिल्ह्याची समग्र लोकसंस्कृती लोकगीतांतून व्यतीत झालेली दिसून येते.

- डांग जिल्ह्यातील लोकगीतांमधून लोकदेवतांचा व लोकपरंपरांचा परिचय होतो.
- पुराण वाङ्मयाचा डांगी लोकगीतांवर प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यांच्या लोकगीतांतून वेळोवेळी रामायण महाभारतकालीन संदर्भ उल्लेखित होतात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समाजाची जीवनविषयक चिंतनशीलता व्यक्त होते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून आजूबाजूच्या भूप्रदेशाचे यथोचित वर्णन आलेले दिसते.
- पारंपरिक लोकजीवनाचे विशेष त्यांच्या लोकगीतांतून पाहावयास मिळतात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समूहमनाला प्राधान्य दिलेले असते. एकटी व्यक्ती कधीच गात नाही. तर ती समूहाला सोबत घेऊनच गात असते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांचा विचार करता, पुरुष लोकगीतांपेक्षा स्त्री लोकगीतांचा वाटा अधिक आहे असे दिसत असले तरी स्त्री आणि पुरुष दोघांचीही लोकगीते आपापल्या जागी श्रेष्ठ दर्जा टिकवून आहेत.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समाजाचे प्रभावीपणे दर्शन होते. समाजाच्या आशा आकांक्षा प्रदर्शित होतात. इतिहासाच्या पाऊलखुणाही त्यातून उमटलेल्या दिसतात.
- डांग जिल्ह्यातील विवाहविषयक लोकगीतांतून वधू-वरांवर भावी सांसारिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे संस्कार केले जातात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून अनेक भावभावनांचे पदर उलगडून पाहता येतात.
- काही लोकगीतांतून अतिशयोक्ती झालेली दिसून येते. उदा. पितळी वळया, रुप्याचा वासा इत्यादी. अशा अतिशयोक्तीतून त्यांच्या कल्पकतेची चांगली जाणीव होते.
- डांग जिल्ह्यात स्त्री आणि पुरुष यांची स्वतंत्र लोकगीते पाहायला मिळतात. म्हणजेच स्त्रियांच्या लोकगीतांमध्ये पुरुष किंवा पुरुषांच्या लोकगीतांमध्ये स्त्रिया कधीही सहभागी होत नाहीत.
- डांग जिल्ह्यातील इतर लोकसाहित्य प्रकारांहून लोकगीत या लोकसाहित्य प्रकारावर मराठीचा सर्वाधिक प्रभाव असल्याचे दिसून आले आहे.
- डांग जिल्ह्यात डांगी बोली बोलली जात असली तरी लोकगीते बहुतेकदा मराठीतूनच गायली जातात.
- डांग जिल्ह्यात डांगी बोलीतून लोकगीते गायली जात नसल्याचे आढळून आले आहे.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून परिसरातील विविध घटना स्थळांचे परिणामकारक व महत्त्वपूर्ण चित्रण केलेले दिसून येते.
- पुरुष लोकगीतांपेक्षा स्त्री लोकगीतांतून सांसारिक विषय अधिक परिणामकारकरीत्या हाताळलेले दिसून येतात.

- डांग जिल्ह्यातील लोकगीतांना धार्मिकतेची सौम्य झालर लावलेली दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या लोकगीतांतून वेळोवेळी देवीदेवतांची, धार्मिक स्थळांची, पवित्र स्थानांची किंवा वस्तूंची चर्चा व वर्णन केलेले दिसते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांवर बदलत्या काळानुसार अनेक घटना प्रसंगांचे परिणाम झाल्याचे दिसून येते. येथील लोकगीतांवर आधुनिकतेचा सौम्य थर चढलेला दिसून येतो.

## ८. ५. प्रकरण पाचवे: डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे, वाक्प्रचार:

- म्हणी आणि उखाणे यांच्या प्राचीनतम पाऊलखुणा वेद वाङ्मयात सापडतात. यावरून म्हणी आणि उखाणे वेदांच्या आधीही जनमानसात प्रचलित होते असे म्हणता येते.
- म्हणी अनुभवाधारित असल्याने त्या एकाच वेळी अनेक स्थळी सारख्याच आशय घेऊन निर्माण होतात. यावरून म्हणींची सार्वत्रिकता मान्य करावी लागते.
- म्हणीतील लघुता, सत्यता, सूक्ष्मता, तीक्ष्णता, व्यावहारिकता, लोकमान्यता आणि चटकदारपणा हे गुण सर्वांनीच मान्य केले असले तरी आतापर्यंत सर्वसमावेशक अशी म्हणीची व्याख्या कोणालाही करता आलेली नाही.
- म्हण ही कोणत्यातरी एकाच व्यक्तीची निर्मिती असते, परंतु अनुभवाची पातळी एकच किंवा सारखीच असल्याने ती म्हण जनमानसात फिरता फिरता गुळगुळीत होऊन तिच्यावरचे निर्मात्याचे नाव खोडले जाते. आणि ती म्हण जनांची, लोकांची होऊन बसते.
- डांग जिल्ह्यातील म्हणींवर मराठीबरोबरच इतरही भाषांतील म्हणींचा प्रभाव दिसून येतो.
- डांग जिल्ह्यातील म्हणींमध्ये गुजराती भाषेतील शब्दांपेक्षा मराठी भाषेतील शब्दांचा अधिक भरणा आहे. त्याचवेळी त्या डांगी बोलीचे वेगळेपणही स्पष्टपणे दर्शवितात.
- डांगी म्हणींचे डांगीकरण झालेले दिसून येते. मात्र डांगी लोकगीतांचे डांगीकरण अजूनही झालेले नाही. म्हणजेच डांगी म्हणींची भाषा डांगी असली तरी डांगी लोकगीतांची भाषा मराठीच आहे.
- डांगी आदिवासींचे मूळ आणि कुळ महाराष्ट्रातील असल्याने अजूनही त्यांच्यावर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.
- ही संस्कृती मुळची महाराष्ट्राची असून इतिहासात महाराष्ट्राने त्यांच्यावर केलेला अन्याय अपराधीपणाचा आहे.
- डांग जिल्ह्यात सत्यता, चांगुलपणा, अतिशयोक्ती, गरिबी, कौटुंबिकता, आळशीपणा इत्यादींशी निगडीत म्हणी आढळून येतात.

- डांग जिल्ह्यातील म्हणी आणि उख्याण्यांमध्ये प्राणी, पक्षी, कीटक, झाडे, नदी, डोंगर, सूर्य, चंद्र इत्यादी पत्रांचा वावर दिसून येतो.
- डांग जिल्ह्यातील उखाण्यांमध्ये नाव घेण्याचे उखाणे सापडत नाहीत. ही प्रथा प्रामुख्याने महाराष्ट्रातच दिसून येते.
- दीर्घ स्वरूपाचे उखाणे डांग जिल्ह्यात आढळून येत नाहीत. अगदी दोन ते तीन कडव्यांत हे उखाणे पूर्ण केले जातात.
- डांग जिल्ह्यातील उखाणे प्रामुख्याने प्रश्न स्वरूपाचे असून त्याचे उत्तर देणे अपेक्षित असते. त्याशिवाय उखाणा पूर्णत्वास जात नाही. ज्यात प्रश्न नाही, कूट नाही, उत्तराची अपेक्षा नाही असा एकही उखाणा मला डांग जिल्ह्यात सापडला नाही.
- म्हणी, उखाणे तसेच वाक्प्रचार यांच्या आधारे डांग जिल्ह्यातील आदिवासींच्या संस्कृतीचे दर्शन होते.
- डांग जिल्ह्यातील आदिवासी आपल्या बोलण्यात वाक्प्रचारांचा यशस्वीपणे वापर करतात.
- वाक्प्रचाराच्या संदर्भात कोणत्याही एकाच हेतूने किंवा उद्देशाने वाक्प्रचाराचे वर्गीकरण करणे कठीण असून एकच वाक्प्रचार अनेक वर्गीकरण प्रकारामध्ये बसू शकते.

## ८. ६. प्रकरण सहावे: डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या:

- प्रत्येक सण कोणत्या ना कोणत्या प्रथेशी, श्रद्धेशी संबंध राखून असल्याचे दिसून आले आहे. उदा. होळी सणाला अश्लील शब्दांचे वर्णन करणे, पोळयाला बैलांची पूजा करणे, अखात्रीला (अक्षयतृतीया) पूर्वजांची पूजा करणे इत्यादी.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींचा मृत्यूनंतरच्या जीवनावर दृढ विश्वास आहे. उदा. अक्षयतृतीयेची किंवा सर्वपित्री अमावस्येची पूर्वजपूजा, पिंडदानाच्या वेळी कावळयाच्या रुपात पूर्वज येणे, पुनर्जन्म, अतृप्त आत्म्याचे भटकणे इत्यादी.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पना परस्परपूरक आहेत.
- लोकप्रथा आणि लोकविद्या या संकल्पना लोकभ्रम आणि लोकश्रद्धा यांच्याहून व्यापक आहेत.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पना अतिशय गुंतागुंतीच्या असून त्यांना एकमेकींपासून वेगळे करता येत नाही.
- एखादा लोकभ्रम किंवा लोकश्रद्धा ठरवितांना त्या त्या समाजाच्या विचारसरणीचा अभ्यास करावा लागतो.

- लोकभ्रम आणि लोकश्रद्धा यांची भिन्न कालखंडात अदलाबदल होऊ शकते.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पनांवर डांग आणि डांगच्या परिसरातील आदिवासींचा दृढ विश्वास असल्याचे दिसून आले आहे.
- लोकप्रथांत एकाचवेळी स्थिरता आणि परिवर्तन असे द्वंद्वात्मक धोरण दिसून येते. उदा. होळीचा सण. यातील दहन क्रिया सर्वत्र स्थिर असून अश्लीलतेत परिवर्तन होतांना दिसते.
- लोकप्रथेचे पालन आणि परिवर्तन वैयक्तिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर घडून येते.
- लोकप्रथा सतत परिवर्तनशील असून तिच्यात इतिहासातील अनेक खुणा चिकटून असतात.
- डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम आणि लोकश्रद्धा या भीतीपोटी निर्माण झालेल्या आहेत. तर काही वेळा सुफलनाच्या आशेपोटीही निर्माण झालेल्या दिसतात.
- डांगमधील लोकभ्रमांना जनमान्यता प्राप्त झाल्याने ते समाजात आजही टिकून आहेत.
- डांगच्या आदिवासींचे मन भयमुक्त होत नाही तोपर्यंत लोकप्रथा, लोकभ्रम आणि लोकश्रद्धा समाजात टिकून राहतील.
- डांगमधील आदिवासी लोकप्रथांमागे किंवा लोकभ्रमांमागे असलेल्या कार्यकारणभावाची शहानिशा न करताच अनुकरण करत असल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच ते अनुकरणप्रिय आहेत. परंतु याचा परिणाम म्हणून बऱ्याच लोकप्रथांमागे किंवा लोकभ्रमांमागे असलेल्या कारणांचा लोप होत आहे.
- डांगमधील आदिवासींचा रुपांतरावर विश्वास आहे. उदा. चेटकिणीचे (भुताळीचे) मांजरीत रुपांतर, चेटकिणीचे घुबडात रुपांतर, देवी-देवतांचे; भूतांचे; गुरुचे अंगात संचारणे, मृत व्यक्तीचे भूतात रुपांतर, मृतात्म्याचे कावळ्यात रुपांतर, पुनर्जन्म इत्यादी.
- प्रत्येक समस्येचे समाधान किंवा कोणत्याही रोगाचे निदान आणि उपचार भगताकडे असते असा येथील आदिवासींचा समज आहे.
- धन-धान्याचे महत्त्व ओळखून कोणत्याही धान्याची नासाडी न करणे हे परंपरेने मिळालेले ज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे.
- डांगी आदिवासींच्या प्रथा, परंपरा, समजुती, भ्रम, श्रद्धा, अंधश्रद्धा, विद्या, तंत्र, मंत्र यांच्या मुळाशी जीवन सुखावह होण्यासाठी चाललेली धडपड दिसते. जीवन सुखमय व्हावे, जीवन सुरळीत चालावे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ नये हाच हेतू या सगळ्या विधींमागे दिसून येतो.
- डांगमध्ये अनेक प्रकारचे विधी करून स्वतःला आणि संपूर्ण गावाला सुरक्षित केले जाते. मात्र हे सुरक्षाकवच कालांतराने क्षीण होते. त्यामुळे विशिष्ट काळानंतर पुन्हा तेच ते विधी

करावे लागतात. हा काळ वार्षिक असू शकतो किंवा दैनिकही असू शकतो. उदा. वार्षिक विधींमध्ये विविध सण-उत्सवांचा विचार करता येतो. तर दैनिक विधींमध्ये दृष्ट उतरणे वगैरेंचा विचार करता येतो.

**८. ७. प्रकरण सातवे: डांग जिल्ह्यातील बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास:**

- मराठी माणसाच्या उदासीनतेमुळे डांगी बोलीचे गुजरातीकरण होतांना दिसत आहे.
- डांगी बोलीकडे मराठी अभ्यासक, संशोधकांनी दुर्लक्ष केल्याने डांगी बोलीभाषक महाराष्ट्रापासून दूर गेले.
- खानदेशी किंवा अहिराणी बोलीविषयी मराठी माणसाने जेवढी आपुलकी दाखवली तेवढी डांगी बोलीविषयी दाखवली नाही.
- मराठी माणसाने डांगी बोलीविषयी आज माघार घेतलेली आहे. म्हणजेच डांगी बोलीविषयी मराठी माणसाकडून किंवा महाराष्ट्र शासनाकडून आज तरी कोणत्याही प्रकारचे सकारात्मक प्रयत्न होतांना दिसत नाही.
- डांग जिल्ह्यातील बोली मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांना जवळची आहे हे निर्विवाद. परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती ही की, भविष्यात डांगी बोलीवरचा मराठी भाषेचा प्रभाव कमी होत जाईल. त्या ठिकाणी गुजराती भाषेचा प्रभाव वाढलेला दिसेल. येणाऱ्या पिढीमध्ये त्याच्या पाऊलखुणा आताच दिसायला लागल्या आहेत.
- सध्याच्या स्थितीत साठहून अधिक वयाने असलेल्या डांगी माणसांच्या मनामध्ये मराठी भाषेबद्दल थोडीशी आपुलकी असलेली दिसून येते. मात्र नवीन पिढीमध्ये मराठी भाषेबद्दलची आपुलकी दिसून येत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन पिढीला मिळणारे गुजराती माध्यमाचे शैक्षणिक वातावरण.
- डांग जिल्ह्यातून मराठी शिकणाऱ्यांची संख्या सध्या शून्य टक्क्यावर आहे, तर गुजराती शिकणाऱ्यांची संख्या शंभर टक्केच्या जवळपास आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे डांग जिल्ह्यात आज मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध नाही.
- डांगी बोलीचा पहिला लिखित पुरावा ग्रिअर्सनच्या ‘Linguistic Survey of India’ च्या माध्यमातून १९०७ नंतरचा मिळतो. डांग प्रदेशाचा उल्लेख रामायण-महाभारतात दंडकारण्य म्हणून केला गेला असला तरी डांगी बोलीविषयी तत्कालीन कोणताही लिखित पुरावा उपलब्ध होत नाही.
- डांगी बोलीवर कोणत्याही एका भाषेचा किंवा बोलीचा प्रभाव आहे असे म्हणता येत नाही.

- डांगी बोली ही मराठी, गुजराती या भाषांबरोबरच अहिराणी, कोकणी, भिल्ली, वारली, गामीत इत्यादी बोलींचे मिश्रण आहे असे म्हणता येते.
- महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगत असलेल्या डांग प्रदेशावर मराठी भाषेचा प्रभाव असल्याचे स्पष्टपणे दिसते. मात्र डांग जिल्ह्याच्या केंद्रस्थानाकडे जातांना मराठी भाषेचा प्रभाव कमी कमी होत गेल्याचे दिसून येते. डांग जिल्ह्याच्या केंद्रस्थानाकडून गुजरात राज्याच्या दिशेने म्हणजेच उत्तरेकडे जात असतांना गुजराती भाषेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

*****